वितरण आदेश क्रमांक-४

पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत
सन २०१२-१३ मधील निधी वितरण.

**महाराष्ट्र शासन,**
**नियोजन विभाग,**
**शासन आदेश क्रमांक पघावि-२०१२/प्र.क्र.५५/का.१४८३**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक: २० ऑक्टोबर, २०१२**

**शासन आदेश:-**

पश्चिम घाट विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी सन २०१२-१३ या वर्षासाठी रु.४३८४.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला असून सदर नियतव्ययापैकी रु. ३२८८.०० लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पित निधीपैकी सोबतच्या **विवरणपत्र-अ व ब मध्ये** दर्शविल्यानुसार **रु. ३२,८८,०००,००/- (अक्षरी रुपये बत्तीस कोटी अठ्याऐंशी लक्ष** मात्र ) इतका निधी संबंधित नियंत्रण अधिका-यांना/यंत्रणांना वितरित करण्यात येत आहे.

२. सदर निधीच्या डिसेंबर २०१२ पर्यंत केलेल्या खर्चाच्या आधारावर दुस-या हप्त्याचे वितरण होणार आहे. सबब सर्वच नियंत्रण अधिका-यांनी सदरचा निधी ५ दिवसाच्या आत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करावा.**सदरचा निधी मंजुर आराखडयातील कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करावा.** तसेच **यंत्रणांनी तो निधी मंजूर आराखडयातील कामांवरच खर्च करावा.** नियंत्रण अधिका-यांनी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांना निधीचे विहीत वेळेत करुन पुढे वितरीत केलेल्या निधीच्या वितरण आदेशाची प्रत शासनास द्यावी, निधी वितरण विहीत वेळेत न झाल्यामुळे खर्चात अडचणी आल्यास संबंधीत नियंत्रण अधिकारी / अंमलबजावणी यंत्रणा जबाबदार राहतील.

३. पाणलोट क्षेत्राची कामे माथा ते पायथा (Top to Bottom) या पध्दतीने करावयाची असतात. प्रामुख्याने वन क्षेत्र हे माथ्याकडे (Top) असते, सबब त्यांची कामे प्राथम्याने होणे आवश्यक आहेत. **सबब** पाणलोट आराखडयामध्ये वन क्षेत्रातील कामांना प्राथम्याने निधी उपलब्ध करून द्यावा. ज्या पाणलोटक्षेत्रामध्ये याचे पालन होणार नाही त्यांना पुढील निधी वितरण होणार नाही. वन तसेच सामाजिक वनिकरणांच्या कामांनाही आराखडयाप्रमाणे निधी उपलब्ध करून द्यावा.

४. सर्वच नियंत्रण अधिकारी/ यंत्रणांनी निधी विहीत पध्दतीने खर्च करावा व केलेल्या खर्चाची माहिती प्रत्येक महिन्यास सादर करावी. तसेच दि.३१ मार्च,२०१३ पर्यंत केलेल्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावीत.

५. नियंत्रण अधिका-यांनी होणा-या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल कार्यालयाच्या नोंदीशी वेळेवर घालणा जाईल तसेच प्रत्यक्ष खर्च व महालेखापाल कार्यालयात नोंद झालेला खर्च यात तफावत राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. खर्चामधील तफावतीस व त्याबाबत करावयाच्या कार्यवाहीस संबंधीत कार्यान्वयीन नियंत्रण अधिकारी/ यंत्रणा जबाबदार राहतील.

6check.rediff.com/bn/downloadajax.cgi/WGDP-1.jpg?login=jdasoil&session_id=6L30PK1KGKxVoPAN87dUvyUruKu6GvxV&formname=download&fold... 10/25/2012

६. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमावलीतील परि.१५५ (चार) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक नियंत्रण अधिका-यांनी / यंत्रणांनी अर्थसंकल्प नियम पुस्तिका नमुना क्र.१० मध्ये एक खर्चाची नोंदवही ठेवावी व त्यामध्ये नोंद केलेले आकडे अद्ययावत असतील हे पहावे. वित्त विभाग क्र.संकीर्ण-१००१/प्र.क्र.१४९/कोषा- प्रशा -५, दि.१.३.२००४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे चुकीच्या पध्दतीने खर्चमेळाचे काम करणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द नियंत्रण अधिका-यांनी उचित कार्यवाही करावी.

७. या कार्यक्रमांतर्गत केलेल्या खर्चाचे आर्थिक व भौतिक साध्य (कामनिहाय) शासनास दरमहा ५ तारखेपूर्वी सादर करावे. आपण सदर अहवाल do20planning@maharashtra.gov.in या इ-मेल आयडी वर देखील पाठवू शकाल. तसेच पूर्ण झालेल्या कामांचा, काम पूर्णत्वाचा दाखला व काम हस्तांतरीत केल्याचा दाखला देखिल शासनास सादर करावा.

८. मंजूर तरतूदीपेक्षा खर्च जास्त झाल्याचे आढळून आल्यास, संबंधित नियंत्रण अधिकारी / आहरण व संवितरण अधिकारी यांना व्यक्तिश: जबाबदार धरले जाईल.

९. यासंबंधी होणारा खर्च, " मागणी क्र ओ-५, २५५१-डोंगराळ क्षेत्रे, ००२ डोंगराळ क्षेत्रांचा विकास (००) (१७) पश्चिम घाटाचा विकास (केंद्र हिस्सा) (२५५१ ०२५२) योजनांतर्गत व २५५१-डोंगराळ क्षेत्रे, ००२ डोंगराळ क्षेत्रांचा विकास (००) (१८) पश्चिम घाटाचा विकास (राज्य हिस्सा) (२५५१ ०२६१)" योजनांतर्गत या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

१०. राज्य निवडणूक आयोगाचे वेळोवेळी निवडणूकी संदर्भातील आचारसंहितेचे निर्गमित होणारे आदेश विचारात घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

११. सदरचे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७०९/ अर्थ-१६ दि.११/१०/२०१२ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सु.ना.शिंदे)
अवर सचिव, नियोजन विभाग

सोबत : वितरणपत्र "अ "ब " क"

प्रत,

१) महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई

F:\New folder 1\WGDP 2012\G R 55.2012 निधी वितरण.docx

५५ १५

विवरणपत्र-अ

शासन आदेश, नियोजन विभाग क्रमांक पघावि-२०१२/प्र.क्र.५५/का.१४८३,

दिनांक : २० ऑक्टोबर २०१२ चे सहपत्र

अ) केंद्र हिस्सा

(रुपये हजारात)

| लेखाशीर्ष | अंमलबजावणी यंत्रणा / नियंत्रण अधिकारी | खर्चाचे उद्दिष्ट | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| मागणी क्रमांक ओ-५, २५५१ डोंगराळ क्षेत्रे ०१ पश्चिम घाट पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,राज्य योजनांतर्गत योजना | | | |
| २५५१-डोंगराळ क्षेत्रे, ००२ डोंगराळ क्षेत्रांचा विकास (००) (१७) पश्चिम घाटाचा विकास (केंद्र हिस्सा) (२५५१ ०२५२) | १)उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय | ०१ वेतन | ४५०० |
| | | ०६ दूरध्वनी, वीज व पाणी देयके | १०० |
| | | ११ देशांतर्गत प्रवास खर्च | २१५ |
| | | १३, कार्यालयीन खर्च | २१५ |
| एकुण, पघावि कक्ष | | | ५०३० |
| | २)उप सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ३७०० |
| एकूण , पर्यावरण विभाग | | | ३७०० |
| | ३)संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | | |
| | १)WF-४९ | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ३२८८० |
| | २) TE-११४A | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | १७५०० |
| | ३) TE-१३९A | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ३५००० |
| | ४) GV-१०३ | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ५००० |
| | ५) KR-७ | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ३९००० |
| | ६) KR-४४ | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | २२५०० |
| | ७) WF-२३ | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ५००० |
| | ८) KR-३ | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ३४००० |
| एकूण, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र | | | १९०८८० 19.08 कोटी |
| | ४)मुख्य वन संरक्षक (प्रा) पुणे वनवृत्त, महाराष्ट्र राज्य, पुणे | ५३ मोठी बांधकामे | ६०१०४ |
| एकूण ,वनसंवर्धन व विकास | | | ६०१०४ |
| | ५)संचालक, सामाजिक वनीकरण, म. रा. पुणे | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | २९५६ |
| एकूण,संचालक, सामाजिक वनीकरण, म. रा. पुणे | | | २९५६ |
| | ६) जिल्हाधिकारी, सिंधूदूर्ग मार्फत नगरपालिका , सावंतवाडी | ३१ सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) | ७००० |
| एकूण,नगरपालिका, सावंतवाडी | | | ७००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ७)मुख्य कार्यकारी अधिकारी, म.रा.खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | ३१ सहाय्यक अनुदान(वेतनेतर) | ५५५४ |
| **एकूण ,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग** | | | **५५५४** |
| | ८)अ)अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, ठाणे | ५३ मोठी बांधकामे | ६९६ |
| | ब)अधीक्षक अभियंता, सा.बां.मं.,रत्नागिरी | ५३ मोठी बांधकामे | ५००० |
| | क)अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, सातारा | ५३ मोठी बांधकामे | ५००० |
| | ड)अधीक्षक अभियंता, सा.बां.मं.,रत्नागिरी (सिंधुदुर्ग करिता) | ५३ मोठी बांधकामे | ५००० |
| | इ)अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, पुणे | ५३ मोठी बांधकामे | ५००० |
| **एकूण ,रस्ते (साकव)** | | | **२०६९६** |
| **एकूण १ ते ८** | | | **२९५९२०** |

## विवरणपत्र- ब

ब) राज्य हिस्सा

(रुपये हजारात)

| लेखाशीर्ष | अंमलबजावणी यंत्रणा / नियंत्रण अधिकारी | खर्चाचे उद्दिष्ट | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २५५१-डोंगराळ क्षेत्रे, ००२ डोंगराळ क्षेत्रांचा विकास (००) (१८) **पश्चिम घाटाचा विकास** (राज्य हिस्सा) (२५५१ ०२६१ | मुख्य वन संरक्षक (प्रा) पुणे वनवृत्त, महाराष्ट्र राज्य, पुणे | ५३ मोठी बांधकामे | ३२८८० |
| **एकूण ,वनसंवर्धन व विकास** | | | ३२८८० |

(सु.ना.शिंदे)
अवर सचिव, नियोजन विभाग

F:\New folder 1\WGDP 2012\C 8 55.2012 निधी वितरण.docx